महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नाशिक

छत्रपती शिवाजी स्टेडियम, हुतात्मा स्मारकाचे मागे, नाशिक. दूरध्वनी-२५७७७१९

जा.क्र.जि.क्री.अ./राक्रीप्रआ/2018-19/का-5/148 दिनांक:-01/03/2019

प्रति,

मा.अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य रोईंग असोसिएशन,पुणे.

विषय:-राज्यस्तरावर रोईंग या क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन सन 2018-19.
वरिष्ठ पुरुष व महिला खेळांडुची नावे पाठविणेबाबत.

संदर्भ:-1) शासन निर्णय क्र.राक्रीधो-2012/प्र.क्र.231/क्रीयुसे-1 दिनांक 13 फेब्रुवारी 2014.
2) मा.आयुक्त,क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र.शिक्रीपी/राक्रीप्रशि/आयोजन/2018-19/का-13/282 दि.28 जुन 2018.
3) ) मा.आयुक्त,क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र.शिक्रीपी/राक्रीप्रशि/पुम/2018-19/का-13/283 दि.28 जुन 2018.
4)या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जि.क्री./राक्रीपआ/2018-19/का-5/97 दिनांक 18/02/2019 चे पत्र.

महोदय,

आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडु तयार करण्यासाठी उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक दोन अन्वये आपणास विनंतीपुर्वक कळविण्यात येते की,रोईंग या खेळाचे राज्यस्तर क्रीडा प्रशिक्षण शिबिरांचे (सन 2018-19) आयोजन करण्याची जबाबदारी नाशिक जिल्हयाकडे देण्यात आलेली आहे. या शिबीरामध्ये रोईंग या खेळांचे एकुण 08 खेळांडुचा समावेश आहे.या क्रीडा प्रशिक्षण शिबीराचा तपशील खालीलप्रमाणे या कार्यालयाने निश्चित केलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | खेळांचे नाव | रोईंग |
| 2 | खेळाडु उपस्थितीचे ठिकाण व वेळ | दिनांक 04/03/2019 सकाळी 10.00 वाजता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,नाशिक. |
| 3 | निवास व भोजन व्यवस्था | उपस्थितीच्या ठिकाणी सांगण्यात येईल. |
| 4 | प्रशिक्षणाचे ठिकाण | वॉटर्स ऐज बोट कल्ब ,सावरकर नगर, गंगापुर रोड,नाशिक. |
| 4 | प्रशिक्षणाचे कालावधी | 04/03/2018 ते 18/03/2018 |
| 5 | संपर्क नंबर | श्री.पवार पी.एम.(क्रीडा अधिकारी)जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,नाशिक दुरध्वनी क्रमांक-9423969265 |

संदर्भिय पत्र क्रमांक तीन व चार अन्वये आपणाकडे राज्यस्तरावर रोईंग या क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण शिबीरांचे आयोजनात सहभागी होण्यासाठी प्रत्येकी 04 पुरुष व 04 महिला असे एकुण 08 खेळांडुची नावे संघटनेच्या लेटर पॅडवर व खेळाडुंनी परिपुर्ण भरलेल्या फॉर्मवर आपलया सहि व शिकयासह संचालनालयास पाठविण्यास सुचित केलेले होते.

## या प्रशिक्षणासाठी खेळाडु सहभागी होण्याची पात्रता खालील प्रमाणे आहे.

1)सन 2017-18 मध्ये झालेल्या पुरुष् व महिला अधिकृत राज्य अंजिक्यपद स्पर्धेतुन राष्ट्रीय अंजिक्यपद स्पर्धेसाठी निवड करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागी/प्राविण्य प्राप्त खेळाडु,राज्यस्तरावरील प्राविण्य प्राप्त खेळाडु व यानंतर उदयोन्मुख खेळाडु यांचा विचार सदरील शिबीरासाठी करण्यात यावा.तो खेळाडु राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये सहभाग घेतलेला असल्यास तो महाराष्ट्र राज्याच्या संघाकडुन घेतलेला असावा. सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ नुसार खेळांडुच्या वैयक्तिक माहिती अर्ज विहित नमुणा खेळाडु मार्फत शिबिर कालावधीत सादर करण्यात यावा.

## या प्रशिक्षणासाठी क्रीडा मार्गदर्शक पात्रता पात्रता खालील प्रमाणे आहे.

1)सबंधित संघटनेचा अधिकृत क्रीडा प्रशिक्षक असावा.
2)एन.आय.एस.पदविका/प्रमाणपत्र/लेवल कोर्स प्रमाणपत्र धारक क्रीडा मार्गदर्शक.
3)उत्कृष्ट मार्गदर्शक राज्य पुरस्कारार्थी
4)शिवछत्रपती पुरस्कारार्थी व अनुभवी क्रीडा मार्गदर्शक.

तरी कृपया आपणास विनंती की,आपल्या खेळाडुच्या नावांची यादी व माहिती दिनांक 02/03/2019 पर्यंत या कार्यालयास टपालाने तसेच desk13.dsys-mh@gov.in व donashik2013@gmail.com या- इमेलवर पाठविण्यात यावी ही विनंती आहे.

सोबत सहपत्र:-1) परिशिष्ट अ वरीष्ठ गटातील पुरुष व महिला खेळाडु वैयक्तिक अर्ज नमुना.
2) परिशिष्ट ब वरीष्ठ गटातील पुरुष व महिला खेळाडु माहिती तक्ता (असोसिएशनच्या लेटर हेडवर).
3) परिशिष्ट क वरीष्ठ गटातील पुरुष व महिला क्रीडा मार्गदर्शक वैयक्तिक माहिती अर्ज नमुना.

आपला विश्वासु,

(रविंद्र नाईक)
जिल्हा क्रीडा अधिकारी,
नाशिक.

प्रत माहितीस्तव सविनय सादर:-
1)मा.आयुक्त,क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य ,पुणे.
2)मा.उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा,नाशिक विभाग,नाशिक.
प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर:-
1)मा.अध्यक्ष,नाशिक जिल्हा रोईंग असोसिएशन,नाशिक.